पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०५

**सभावृत्तांत**

दिनांक – **१५/०१/२०२१** वेळ - **दुपारी ३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.विधी समिती**ची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१५/०१/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.वसंत प्रभाकर बोराटे
३. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
५. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.लोणकर-उप आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.४) बो-हाडेवाडी, बनकरवस्ती ते मोशी (देहूफाटयापर्यंत) पुणे-नाशिक महामार्गालगत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे (नि.क्र.३/६१/२०१९-२०) मा.वसंत बोराटे, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

**---------**

**अ) दिनांक १८/१२/२०२०, व ०१/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**आ) दिनांक ०१/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**----------**

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १५/०१/२०२१ विभाग-प्रशासन

सुचक : मा.वसंत बोराटे अनुमोदक : मा.पौर्णिमा सोनवणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/६९२/२०२० दि.१५/१२/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेनुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर '**चिफ केमिस्ट**' अभिनामाचे **१** पद **र.रु १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)** मध्ये शासन मंजूर असून सदरचे पद रिक्त आहे. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारीत केलेली अर्हता पुढीलप्रमाणे :- महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पुढीलप्रमाणे, **पदोन्नतीने १००% -** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील केमिस्ट या पदावरील किमान ३वर्ष सेवा पुर्ण झालेल्या

अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. **'चिफ केमिस्ट'**रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०२/११/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व '**चिफ केमिस्ट**' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्च, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, **श्री.जगताप प्रशांत अरुण, केमिस्ट** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञायाचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून '**चिफ केमिस्ट**' पदावर **र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार शासन मंजूरीच्या अधिन तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, **श्री.जगताप प्रशांत अरुण** यांना **र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)** मध्ये '**चिफ केमिस्ट**' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक - १६ | विषय क्रमांक - ०२

दिनांक - १५/०१/२०२१ | विभाग- ग क्षेत्रीय विद्युत

सुचक : मा.पौर्णिमा सोनवणे | अनुमोदक : मा.सीमा चौगुले

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/गक्षे/थेर/३/२६४/२०२० दि.०३/०६/२०२०

**विषय-पिंपरी प्रभाग क्र.२१ जिजामाता रुग्णालय येथील निवास स्थानामध्ये विद्युत व्यवस्था करणे तसेच वैद्यकीय विभागाच्या मागणी नुसार वॉटर कुलर, गिझर, पी.ए.सिस्टीम जिजामाता रुग्णालय येथे केलेल्या अतिरिक्त बाबींचे बील अदा करणेबाबत..**

**विषय क्र.०२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १७ | विषय क्रमांक - ०३

दिनांक - १५/०१/२०२१ | विभाग- अ क्षेत्रीय विद्युत

सुचक :मा.वसंत बोराटे | अनुमोदक : मा.सीमा चौगुले

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. जा.अक्षेक/वि /कावि/५२२/२०दि.३१/१२/२०

२) मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.वि/जामूका/२२८/२०२१ .१५/१/२०२१

**विषय – आकुर्डी रुग्णालय, ऑटो क्लस्टर जम्बो रुग्णालय येथे विद्युत विषयक कामे करणेबाबत.**

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे संदर्भ क्र.२ चे पत्रानुसार विषय क्र.०३ मागे घेणेस अनुमती देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १५/०१/२०२१

सुचक : मा.वसंत बोराटे अनुमोदक : मा.अमित गावडे

संदर्भ : मा.वसंत बोराटे, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

बो-हाडेवाडी, बनकरवस्ती ते मोशी (देहुफाट्यापर्यंत) पुणे नाशिक महामार्गालगत नविन ड्रेनेज लाईन टाकणेचे काम नि.क्र.३/६१/२०१९-२० अन्वये चालु असून सदर कामाअंतर्गत पुणे नाशिक महामार्गालगत बो-हाडेवाडी,बनकरवस्ती ते मोशी (देहुफाट्यापर्यंत) मलनि:सारण नलिका टाकणेचे प्रयोजन आहे. परंतु पुणे-नाशिक महामार्गामधुन सदर ठिकाणी मेट्रोचे कामासाठी सर्व्हे करणेत आलेला असून त्याअंतर्गत सदर रस्त्याचे रुंदीकरण करुन दोन्ही बाजूने मलनि:सारण नलिका टाकणे बाबतची कार्यवाही करणेत येणार आहे. त्यामुळे बो-हाडेवाडी, बनकरवस्ती ते मोशी(देहूफाटयापर्यंत) पुणे नाशिक महामार्गालगत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामामधुन कामाचे स्थळ बदल करुन प्रभाग क्र.२ मध्ये ठिकठिकाणी मलनि:सारण नलिका टाकणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३२/२०२१
दिनांक : 18/०१/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.